MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५७/२०१६-१७/ १५२ दिनांक:१८-०४-२०१७

**<u>आदेश</u>**
**<u>आदेश केस क्र. ५७/२०१६-२०१७</u>**

१) श्री बाबूराव आण्णाप्पा सुतार कै.आण्णाप्पा धुळाप्पा सुतार, यांचे तर्फे मुलगा १०/४३९ इचलकरंजी ता. हातकणंगले, जिल्हा. कोल्हापूर : **तक्रार अर्जदार (ग्राहक)**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय इचकरंजी **विरुध्द पक्षकार**

३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग इचकरंजी अ

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री बाबूराव आण्णाप्पा सुतार रा.१०/४३९, विश्वकर्मा इमारत, इचलकरंजी यांचे वडील आण्णाप्पा धुळाप्पा सुतार (मृत्यू १९७९) यांचे नावे असलेल्या आणि डिसेंबर २००४ मध्ये कायम स्वरुपी खंडीत केलेल्या वीज जोडणीवरील कथित थकबाकी रु. ४२,२६२.६० पै. रद्द करुन मिळणेबद्दल तक्रारदार यांनी हे अपिल दाखल केले आहे.

## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप

२) तक्रारदार हे इचलकरंजीचे रहिवासी असून त्यांना मुरलीधर , कुमार , पुंडलीक असे भाऊ आहेत. तक्रारदार यांचे वडील कै. आण्णाप्पा धुळाप्पा सुतार हे मयत असून त्यांचे नांवे औद्योगिक वीज ग्राहक क्र. २५०६४३०१५३२० या क्रमांकाची असलेली वीज जोडणी थकबाकी भरुन डिसेंबर २००४ मध्ये कायम स्वरुपी बंद करुन घेतली होती. कै. आण्णाप्पा सुतार यांचे नावे अन्य एक औद्योगिक वीज जोडणी चालू असून त्याचा ग्राहक क्र. २५०३८००३४१७१ असा असून त्याची देयके तक्रारदार हे नियमितपणे भरीत आहेत. ज्या ठिकाणी कायमपणे खंडीत करुन घेतलेले उपरोक्त वीज कनेक्शन होते तेथे एप्रिल २०११ मध्ये पाच सिंगल फेज घरगुती वीज जोडण्या तक्रारदार वगैरेनी घेतल्या आहेत. असे असता खंडीत करुन घेतलेल्या वरील वीज जोडणीची थकबाकी रु. ४२,२६२.६० पै. न भरल्यास दुस-या औद्योगिक वीज जोडणीच्या देयकात वर्ग केली जाईल असे दि. १६-१०-२०१६ च्या नोटीसीने वि.प. यांनी तक्रारदार यांना कळविले . तक्रारदार यांचे असे कथन आहे की, सदरची थकबाकी बेकायदेशीर व मुदतबाहय आहे. तक्रारदार यांनी त्यानंतर दि. १०-१२-२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे तक्रार दाखल केली. परंतु सदर कक्षाने दि. २५-०१-२०१७ च्या आदेशाने त्यांची तक्रार नामंजूर केल्याने प्रस्तुतचे अपिल या मंचासमोर दि.१४.०२.२०१७ रोजी दाखल केले आहे.

## विरुध्द पक्षाची भूमिका

३) माहे मे, जून व जुलै २०१६ मध्ये कायम स्वरुपी वीज खंडीत केलेल्या ग्राहकांची तपासणी करुन त्यावरील असलेली थकबाकी हयात असलेल्या ग्राहकांच्या वीज देयकावर वर्ग करणेच्या आदेशाप्रमाणे दिनांक ०५-१०-२०१६ च्या नोटीसीने श्री आण्णाप्पा धुळाप्पा सुतार यांचे नावावरील उपरोक्त थकबाकी रु. ४२,२६२.६० पै. त्यांच्या नावे असलेल्या ग्राहक क्र. २५०६४३०१५३२० या वीज जोडणीवर वर्ग करण्यात आली होती. त्यानंतर सुधारीत देयक देऊनही तक्रारदार यांनी कक्षाकडे तक्रार दाखल केली. वि.प. यांनी शेवटी असे कथन केले आहे की, तक्रारदार यांना वरील थकबाकी भरण्याचा आदेश या मंचाने करावा.

४) या प्रकरणाची सुनावणी दि. ०६-०४-२०१७ रोजी या मंचासमोर घेणेत आली. तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री विनोद कांबळे यांनी युक्तिवाद केला. वि.प. तर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री पी.ए. काळे, यांनी युक्तिवाद केला. सर्व उपलब्ध कागदपत्रे वाचण्यात आली आहेत.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित होतात.

(१) वीज ग्राहक क्र.२५०६४३०१५३२० या वरील असलेली तथाकथित वीज देयकाची थकबाकी रु. ४२,२६२.६० पै. वसूल करणेसाठी दि. ०५.१०.२०१६ च्या वि.प. यांच्या नोटीसीद्वारे सुरु केलेली कारवाई योग्य व कायदेशीर आहे काय?

उत्तरः- नाही

(२)कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## कारणमिमांसा

६) या कामातील, औद्योगिक वीज जोडणी ग्राहक क्र. २५०६४३०१५३२० ही ब-याच वर्षापासून तक्रारदार यांचे वडील कै. आण्णाप्पा धुळाप्पा सुतार यांच्या नावे चालू होती आणि सदर वीज जोडणी डिसेंबर २००४ मध्ये कायम स्वरुपी बंद करण्यात आली याबद्दल वाद नाही. तथापि , तक्रारदारतर्फे असे सांगण्यात आले की, त्यांनी सदरचे कनेक्शन सर्व थकबाकी भरुन कायमपणे बंद करुन घेतले होते. परंतु आता त्यांच्याकडे थकबाकी भरलेल्या पावत्या इतक्या वर्षानंतर उपलब्ध नाहीत. त्यांचे असेही म्हणणे आहे की, त्याच ठिकाणी त्यांनी व त्यांच्या भावांनी पाच घरगुती वीज जोडण्या एप्रिल २०११ मध्ये घेतलेल्या आहेत. वि.प. यांचे म्हणणे असे आहे की, कायमपणे खंडीत केलेल्या उपरोक्त वीज जोडणी वरील थकबाकी रु. ४२,२६२.६० पै. इतकी अद्याप वि.प. यांना येणे आहे. या अपिलात CPLउतारा दाखल केला नाही.

७) वर परिच्छेद ६ मध्ये नमूद केलेली तथाकथित थकबाकी कै. आण्णाप्पा सुतार यांच्या नावे चालू असलेल्या दुस-या औद्योगिक वीज जोडणी ग्राहक क्र. २५०३८००३४१७१ यावरील वीज देयकांवर वर्ग करण्याची कारवाई वि. प. यांनी दिनांक ०५-१०-२०१६ ची नोटीस देऊन सुरु केलचे दिसते.

८) आण्णाप्पा सुतार हे सन १९७९ मध्ये मरण पावले असे तक्रारदारतर्फे सांगणेत आले आहे. त्यांच्या नावे असलेली उपरोक्त जुनी वीज जोडणी वरील थकबाकीपोटी डिसेंबर २००४ मध्ये कायम स्वरुपी खंडीत करण्या व्यतिरिक्त अन्य कोणतीही कारवाई वि.प. यांनी विद्युत कायदा २००३ चे कलम ५६(१) प्रमाणे केलेली नाही असे दिसून येत आहे. सदर कायद्याच्या कलम ५६(२) मधील स्पष्ट तरतूदीप्रमाणे वसुलीस पात्र असलेली थकबाकीची रक्कम अव्याहतपणे किंवा सततपणे (Continuously) वीज देयकांमध्ये दाखवणेत येऊन कायदेशीर मार्गाने वसूलीची कारवाई चालू केल्या खेरीज, मागिल दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीची थकबाकी कालबाहय होत असल्यामुळे ती वसूलीस पात्र रहात नाही. वादग्रस्त वीज जोडणीवरील थकबाकी डिसेंबर २००४ च्या अगोदरची असून ती सातत्याने किंवा अखंडपणे वेळोवेळी ग्राहकास पाठवलेल्या वीज देयकांमध्ये दर्शविली होती हे दाखविणारा पुरावा रेकॉर्डवर आणलेला नाही. त्यामुळे तक्रारदार यांचेकडून त्यांच्या उपरोक्त जुन्या व कायम स्वरुपी खंडीत केलेल्या वीज जोडणीवरील तथाकथित थकबाकी रु. ४२,२६२.६० पै. मुदतबाहय झाल्यामुळे वसूलीस पात्र नाही असे या मंचाचे निष्कर्ष आहेत.

९) वरील सर्व कारणांस्तव , तथाकथित थकबाकीची रक्कम रु. ४२,२६२,६० पै. वसूल करणेसाठी ग्राहकाच्या दुस-या चालू असलेल्या वीज जोडणीच्या देयकांवर , जवळजवळ १२-१३ वर्षे इतक्या फार मोठया विलंबाने, वर्ग करण्याची वि.प. यांची कारवाई अयोग्य आणि बेकायदेशीर ठरत आहे.

सबब, खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

**आदेश**

१. तक्रारदार यांचे गा-हाणे खालील प्रमाणे मंजूर करणेत येत आहे.
२. कै. आण्णाप्पा धुळाप्पा सुतार, रा.इचलकरंजी यांच्या नावे असलेल्या व कायम स्वरुपी खंडीत केलेल्या ग्राहक क्र. २५०६४३०१५३२० यावरील कथित थकबाकी रु. ४२,२६२.६० पै. वसूलीस पात्र नसल्यामुळे या आदेशाने रद्द करणेत येत आहे.
३. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
३. निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |